**<u>सं. फौ. खटला क्र.११६/२०१७</u>**

**<u>निशाणी क्र.८६</u>**

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०३ चा पुरावा ::</u>**

**<u>शपथेवर सत्य निवेदन करतो की,</u>**

**<u>माझे नांव</u>** : रामेश्वर तुकाराम माने,

**<u>वय</u>** : ३५ वर्षे, **<u>धंदा</u>** : शेती,

**<u>राहणार</u>** : कोनाळी, ता. देवणी, जि. लातूर.

**<u>:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस.एम. हाशमी यांचेमार्फत ::</u>**

फिर्यादी साधुराम माने मयत आहेत. दि.२२/०१/२०१७ रोजी सायंकाळी ५.०० ते ५.३० दरम्यान कोनाळी ते देवणी रोडवर डीपी जवळ पोलिसांनी मला पंचनाम्याकरिता बोलावले होते. दशरथ माने यांनी सदर जागा दाखविली होती. तेथे दशरथ माने, सुकुमार माने व मी हजर होतो. पोलिसांनी तेथे माझ्यासमक्ष पंचनामा तयार केला आणि माझी सही घेतली. मी तो वाचला होता. आता मला पंचनामा दाखविला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामधील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी ८७ देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

**:: <u>आरोपीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. एस.एम. बिराजदार यांच्यामार्फत</u> ::**

०२. दशरथ माने, ग्यानोबा माने व नामदेव माने हे माझे चुलत भाऊ आहेत. लक्ष्मीकांत माने हा माझा सख्खा भाऊ आहे. तो पंचनाम्याच्या वेळेस हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामधील पंचनामा माझ्यासमक्ष झाल्याचे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२२/०१/२०१७ रोजी घटनास्थळी गेलो

नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या चुलत भावांना मदत करण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी फक्त पोलिसांनी सांगितल्याप्रमाणे सह्या केल्या.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि.०५/११/२०२५.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.